रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर
## सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती-२०२३-२४ नवीन व नुतनीकरण
## बी.कॉम. / एम.कॉम. / बी.बी.ए. (सी.ए.)
## अंतीम मुदत -३१/१२/२०२३

**दि. २१/१०/२०२३**

फेब्रुवारी २०२३ मध्ये इयत्ता १२ वीत उत्तीर्ण झालेल्या सिनिअर महाविद्यालयातील पात्र सर्व विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७ एवढ्याच** विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मंजुर होणार आहे. **त्यामुळे अर्ज भरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मिळत नाही याची संबंधीत अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** अशा विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या परिपत्रकात सविस्तर माहिती वाचून पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनीच सदर अर्ज भरुन द्यावा. **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या इतर कोणत्याही फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्ती / फ्रि-शिपचा अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**मागील वर्षी अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मिळालेली असेल अशा विद्यार्थ्यांनी अर्ज नुतनीकरण करावा. नुतनीकरणासाठी मागील वर्षी किमान ५०% गुण आवश्यक.**

**बी.कॉम. व एम.कॉम. मधील जे विद्यार्थी विनाअनुदानित ( नॉन ग्रँट ) तुकडीतील असतील अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या कॅटेगिरीचाच शिष्यवृत्ती अर्ज भरावा. विनाअनुदानित ( नॉन ग्रँट ) तुकडीतील विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरु नये किंवा सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरण्या अगोदर शिष्यवृत्ती विभागात चौकशी करावी मगच अर्ज भरावा.**

अनुदानित व विनाअनुदानित तुकडीत **( EBC/EWS )** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना तसेच **SC, OBC, NT, SBC,ST,Handicap** शिष्यवृत्तीधारक **विद्यार्थ्यांना कोणत्यातरी एकाच फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.** ई.बी.सी. **( EBC/EWS )** मध्ये प्रवेश घेतलेल्या व कॅटेगिरीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन दिला **तर सदर विद्यार्थ्यांना पेईंग प्रमाणे फी भरावी लागेल याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**अर्ज भरुन सर्व कागदपत्र सेल्फ अटेस्टेड करुन शिष्यवृत्ती विभागात दि.३१/१२/२०२३ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:३० वाजेपर्यंत महाविद्यालयात जमा करावा. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ७४१७ एवढ्याच विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने संबंधीत विद्यार्थ्यांनी ३१/१२/२०२३ या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात जमा करावा. अधिक माहितीसाठी वेबसाईटवरील दिलेले शासनाचे परिपत्रक पाहावे.**

**मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही यांची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**अर्ज ऑनलाईन भरताना फक्त ओरिजनलच कागदपत्र अपलोड करावे झेरॉक्स अपलोड करु नये. शिष्यवृत्ती अर्जास खालील कागदपत्रांची झेरॉक्स प्रत दिलेल्या नंबरनुसार सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत.**

१. ऑनलाईन भरलेला अर्ज.
२. ऑनलाईन बोनाफाईड
३. महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज.
४. शाळा सोडल्याचा दाखला व महाविद्यालयाचा दाखला
५. डोमासाईल सर्टिफिकेट / रहिवासी दाखला
६. रेशन कार्ड झेरॉक्स
७. आधार कार्ड झेरॉक्स
८. आधार कार्ड लिंक फॉर्म
९. सन २०२३-२४ मधील प्रवेश पावती.
१०. वडीलांचा वार्षिक उत्पन्नानचा सन २०२२-२३ चा दाखला. उत्पन्न ४.५० लाख रु.च्या आत.
**(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )**
११. दहावी व त्या पुढील सर्व गुणपत्रक
१२. बँक पासबुक

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

**www.cdjcollege.com**

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.

Schol.Dept./E:/C.D. Jain College of Commerce/Shri. Wadankar D.S./Scholarship Notice

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०२३-२४/सीएसएस/ 10241 दि. 13 OCT 2023

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२३-२४ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

**संदर्भ :- केंद्रशासनाचे दिनांक २९.०९.२०२३ रोजीचा ई-मेल.**

उच्च माध्यमिक ( इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७** इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१.१२.२०२३ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे. होकेशनल

❖ **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी** / (Fresh)-
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.

२. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

- **नूतनीकरण** (Renewal)-
    १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ **नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३१.१२.२०२३** ही आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी HSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०th Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फम केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची HSC बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१२. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

❖ **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुण देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२३-२४ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपण` राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
१. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई ०१
३. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
४. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**''सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना''**

**सन २०२३—२४ करिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करणे बाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, राज्यातील उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत ''सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना'' सन २०२३—२४ च्या नवीन (New) शिष्यवृत्ती व नुतनीकरणाचे (Renewal) फॉर्म ऑनलाईन पध्दतीने **दि. ३१/१२/२०२३** पूर्वी खालील संकेतस्थळावर सादर करण्याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. सोबत शासन पत्र व सदर योजनेसंदर्भातील नियम व अटीची प्रत जोडत आहे.

तरी, वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेनुसार User-ID तयार करून ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करावेत. अर्ज करण्यासाठीच्या सर्व आवश्यक सुचना, तसेच शिष्यवृत्तीसाठीच्या पात्रतेचे नियम व अटी वरील संकेतस्थळावरील शासनाच्या संबधीत लिंकवर उपलब्ध आहेत.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/४३०२
दिनांक : १८/१०/२०२३

**प्रतः मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात. तसेच अर्जाच्या प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत या कार्यालयास पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर कराव्यात.

**प्रतः मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देवून अर्जाच्या प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत संबधित महाविद्यालयातील कार्यालयास सादर करण्यास कळविण्यात यावे. तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे सादर झालेले पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयास मान्यतेसाठी फॉरवर्ड करण्यात यावेत.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

Scanned by CamScanner